IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता व समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास

**धनराज राउळकर**
संशोधक
पदव्युत्तर शिक्षण विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ

**डॉ. तिक्ष्या श्यामकुल**
सहाय्यक प्राध्यापिका
पदव्युत्तर शिक्षण विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ

**गोषवारा**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये बौद्धिक क्षमतेबरोबरच सृजनशीलता आणि शाळा, कुटुंब, मित्रसमूह तसेच सामाजिक वातावरणाशी योग्य प्रकारे समायोजन करण्याची क्षमता महत्त्वाची भूमिका बजावते. विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांच्या वैयक्तिक गरजा, उपलब्ध शैक्षणिक सुविधा, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि समावेशक शालेय वातावरण यांचा त्यांच्या सृजनशील विकास व समायोजनावर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता आणि समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे हा आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीअंतर्गत तुलनात्मक संशोधन रचनेचा अवलंब करण्यात आला. उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांची निवड करून प्रमाणित संशोधन साधनांच्या साहाय्याने आवश्यक माहिती संकलित करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या विविध सवयींचे मापन करण्यासाठी Adolescent’s Habits Scale, सृजनशीलतेचे मापन करण्यासाठी संशोधकाने स्वतः विकसित केलेली सृजनशीलता मापन चाचणीचा तसेच शैक्षणिक समायोजनाचे मापन करण्यासाठी Educational Adjustment Inventory (EAI) या साधनाचा वापर करण्यात आला. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, प्रमाण विचलन आणि t-चाचणी यांसारख्या सांख्यिकीय पद्धतींचा उपयोग करण्यात आला. संशोधनातून प्राप्त निष्कर्षांच्या आधारे सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयी, सृजनशीलता आणि समायोजनामध्ये सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय फरक आढळून आला. निष्कर्षांवरून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयी आणि सृजनशीलतेची पातळी तर सामान्य विद्यार्थ्यांची शैक्षणिक समायोजनाची पातळी तुलनेने अधिक चांगली असल्याचे निदर्शनास आले. या निष्कर्षांमुळे विद्यार्थ्यांच्या सवयी, वैयक्तिक क्षमता, सृजनशील गुण, समायोजन क्षमता, गरजा आणि शैक्षणिक अनुभव यांचा विचार करून अधिक समावेशक, विद्यार्थी-केंद्रित आणि संवेदनशील शैक्षणिक नियोजन करणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होते.

**मुख्य शब्द :** अध्ययन सवयी, सृजनशीलता, समायोजन, सामान्य विद्यार्थी, दिव्यांग विद्यार्थी, उच्च प्राथमिक स्तर, समावेशक शिक्षण.

**प्रस्तावना :**

शिक्षण म्हणजे केवळ विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतांचा विकास करण्याची प्रक्रिया नाही, तर त्यांच्या भावनिक, सामाजिक, सृजनशील आणि वैयक्तिक विकासालाही दिशा देणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक विद्यार्थी हा वेगळा असतो. त्याची क्षमता, सवयी, आवडीनिवडी, शिकण्याची गती, कौटुंबिक परिस्थिती आणि सामाजिक अनुभव यांमध्ये भिन्नता आढळते. त्यामुळे शाळेतील शिक्षणव्यवस्थेने ही वैविध्यपूर्णता स्वीकारून प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार शिकण्याची आणि स्वतःच्या कल्पना व विचार व्यक्त करण्याची संधी देणे आवश्यक आहे.

उच्च प्राथमिक स्तर हा साधारणपणे इयत्ता सहावी ते आठवीचा शैक्षणिक टप्पा मानला जातो. या कालखंडात विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र अध्ययनाची सवय, वेळेचे नियोजन, एकाग्रता, गृहपाठ करण्याची पद्धत, वाचनाची सवय आणि परीक्षेची तयारी यांसारख्या अध्ययन सवयी विकसित होतात. या सवयी विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक जीवनासाठी महत्त्वाच्या ठरतात. या वयात विद्यार्थ्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत हळूहळू बदल होऊ लागतो. त्यांच्यामध्ये नवीन गोष्टी जाणून घेण्याची उत्सुकता, प्रश्न विचारण्याची वृत्ती, कल्पनाशक्ती आणि स्वतःच्या पद्धतीने काहीतरी करण्याची इच्छा वाढत असते. त्यामुळे या स्तरावर विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेच्या विकासाला विशेष महत्त्व आहे. चित्रकला, लेखन, हस्तकला, प्रयोग, प्रकल्पकार्य, गोष्टी सांगणे, चर्चासत्रे, समस्या सोडविणे आणि विविध सांस्कृतिक व सहशालेय उपक्रम यांसारख्या संधी विद्यार्थ्यांना दिल्यास ते आपल्या कल्पना अधिक मोकळेपणाने व्यक्त करू शकतात. अशा अनुभवांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन विचार करण्याची, वेगळ्या पद्धतीने समस्या पाहण्याची आणि स्वतःच्या कल्पनांचा उपयोग करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होते. याचबरोबर विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये समायोजनालाही महत्त्वाचे स्थान आहे. समायोजन म्हणजे व्यक्तीने आपल्या गरजा, भावना आणि अपेक्षा यांचा परिसरातील परिस्थिती व इतरांच्या अपेक्षांशी योग्य समतोल साधण्याचा प्रयत्न होय. विद्यार्थ्यांच्या बाबतीत शाळेतील वातावरणाशी, शिक्षकांशी, मित्रमैत्रिणींशी आणि अभ्यासाशी योग्य प्रकारे जुळवून घेणे महत्त्वाचे असते. दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक गरजा आणि परिस्थितीनुसार काही अतिरिक्त अडचणींचा सामना करावा लागू शकतो. मात्र, शिक्षकांचे सहकार्य, पालकांचा आधार, सहाध्यायांचा सकारात्मक दृष्टिकोन आणि शाळेतील अनुकूल वातावरण मिळाल्यास या विद्यार्थ्यांना शालेय जीवनाशी अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेण्यास मदत होऊ शकते.

भारतात दिव्यांग व्यक्तींच्या शिक्षणाच्या अधिकाराला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. Rights of Persons with Disabilities Act, 2016 नुसार शैक्षणिक संस्थांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना भेदभाव न करता शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, त्यांना समान शैक्षणिक व क्रीडा संधी देणे, आवश्यक सुविधा आणि वाजवी सोयी-सवलती उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार आवश्यक शैक्षणिक सहाय्य आणि वैयक्तिक मदत मिळाल्यास ते आपल्या क्षमतांचा अधिक प्रभावीपणे विकास करू शकतात.

म्हणूनच सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे केवळ शैक्षणिक यशाच्या दृष्टीने न पाहता त्यांच्या सवयी, सृजनशीलता, आत्मविश्वास, सामाजिक सहभाग आणि समायोजनाच्या दृष्टीनेही पाहणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना समान संधी, स्वीकारणारे वातावरण आणि त्यांच्या गरजांनुसार योग्य सहाय्य मिळाल्यास ते आपल्या क्षमतांचा अधिक चांगल्या प्रकारे उपयोग करू शकतात. या दृष्टीने समावेशक आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धतीचा अवलंब करणे हे सर्व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे ठरते.

**संशोधनाची गरज :**

समावेशक शिक्षणाचा स्वीकार वाढत असल्यामुळे आज सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थी एकाच शैक्षणिक वातावरणात शिकत आहेत. अशा परिस्थितीत या दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांच्या सवयी, सृजनशीलता आणि समायोजनाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. अध्ययन सवयी चांगल्या असल्यास विद्यार्थ्यांना नियमित अध्ययन, वेळेचे नियोजन, एकाग्रता आणि परीक्षेची तयारी करण्यास मदत होते. सृजनशीलता विद्यार्थ्यांना नवीन कल्पना मांडण्यास, एखाद्या समस्येकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्यास आणि स्वतःच्या विचारांची व भावनांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करण्यास मदत करते. शाळेतील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, कलात्मक आणि सहशालेय उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना सृजनशीलतेचा वापर करण्याच्या अनेक संधी मिळू शकतात. दुसरीकडे, योग्य समायोजनामुळे विद्यार्थ्याला शाळेतील वातावरणाशी जुळवून घेणे, शिक्षक व मित्रांशी सकारात्मक संबंध निर्माण करणे आणि दैनंदिन शालेय जीवनातील विविध परिस्थितींना आत्मविश्वासाने सामोरे जाणे शक्य होते. विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत सृजनशीलता आणि समायोजनाचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. त्यांच्या दिव्यांगत्वाच्या स्वरूपानुसार त्यांना अध्ययन साहित्य, सहाय्यक तंत्रज्ञान, विशेष अध्यापन पद्धती, अतिरिक्त वेळ किंवा इतर शैक्षणिक सहाय्याची आवश्यकता असू शकते.

योग्य सुविधा आणि प्रोत्साहन मिळाल्यास दिव्यांग विद्यार्थीही आपल्या कल्पना, कौशल्ये आणि सृजनशील क्षमतांचा प्रभावीपणे उपयोग करू शकतात. समावेशक शिक्षणाचा उद्देश केवळ सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना एकाच वर्गात शिकवणे एवढाच नसून प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार शिकण्याची, व्यक्त होण्याची आणि शालेय जीवनात सक्रियपणे सहभागी होण्याची संधी देणे हा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील वैयक्तिक भिन्नता समजून घेणे, त्यांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन देणे आणि त्यांना शालेय वातावरणाशी योग्य प्रकारे समायोजन साधण्यासाठी आवश्यक आधार देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयी, सृजनशीलता व समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरते.

**उद्दिष्ट्ये :**

- उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयींचा तुलनात्मक अभ्यास करणे.
- उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
- उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना :**

- उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयींमध्ये सार्थक फरक आढळून येत नाही.
- उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेमध्ये सार्थक फरक आढळून येत नाही.
- उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजनामध्ये सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**जनसंख्या :**

प्रस्तुत संशोधनात नागपूर विभागातील सर्वसामान्य व विशेष शाळांमध्ये शिक्षण घेत असलेले सामान्य व दिव्यांग विद्यार्थी जनसंख्या म्हणून घेण्यात आले आहे.

**न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधनात नागपूर जिल्ह्यातील उच्च प्राथमिक स्तरावरील शाळांची निवड सहेतुक पद्धतीने करण्यात आली. यामध्ये सर्वसामान्य व विशेष शाळांमधून ५० मुले आणि ५० मुली असे एकूण १०० विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला होता.

**संशोधनाची साधने :**

या संशोधनामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध सवयींचे मापन करण्यासाठी Vijaya Lakshmi आणि Shruti Narain यांनी विकसित केलेली Adolescent's Habits Scale ही प्रमाणित संशोधन साधने वापरण्यात आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक समायोजन मोजण्यासाठी Seema Rani आणि Dr. Basant Bahadur Singh यांनी विकसित केलेली Educational Adjustment Inventory (EAI), तसेच विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे मापन करण्यासाठी संशोधकाने स्वतः विकसित केलेली सृजनशीलता मापन चाचणी संशोधन साधने म्हणून वापरण्यात आली.

**सांख्यिकीय तंत्र :**

- मध्यमान (M)
- प्रमाण विचलन (SD)
- t - चाचणी

**माहिती विश्लेषण :**

उद्दिष्ट क्र. १ उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

परिकल्पना १ उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयीमध्ये सार्थक फरक आढळून येत नाही.

| गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t - गुणांक |
|---|---|---|---|---|
| सामान्य विद्यार्थी | ५० | ४९.८२ | ११.८७ | २.२२ |
| दिव्यांग विद्यार्थी | ५० | ५३.८ | ९.४४ | |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की सामान्य विद्यार्थ्यांच्या सवयींची सरासरी ४९.८२ व प्रमाण विचलन ११.८७ आहे, तर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयींची सरासरी ५३.८ व प्रमाण विचलन ९.४४ आहे. प्राप्त t-मूल्य २.२२ असून ते ०.०५ सार्थकता स्तरावरील सार्थक t-मूल्य १.९८ पेक्षा अधिक असल्यामुळे सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवयींच्या सरासरी गुणांमध्ये सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय फरक आढळून येतो. दिव्यांग विद्यार्थ्यांची सरासरी सामान्य विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असल्याने, दिव्यांग विद्यार्थ्यांची सवयी या तुलनेने चांगल्या असल्याचे स्पष्ट होते.

उद्दिष्ट क्र. २ उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

परिकल्पना २ उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेमध्ये सार्थक फरक आढळून येत नाही.

| गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t - गुणांक |
|---|---|---|---|---|
| सामान्य विद्यार्थी | ५० | ७०.१२ | ७.५२ | ५.७६ |
| दिव्यांग विद्यार्थी | ५० | ७८.०२ | ५.५७ | |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की सामान्य विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेची सरासरी ७०.१२ व प्रमाण विचलन ७.५२ आहे, तर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेची सरासरी ७८.०२ व प्रमाण विचलन ५.५७ आहे. प्राप्त t-मूल्य ५.७६ असून ते ०.०५ सार्थकता स्तरावरील सार्थक t-मूल्य १.९८ पेक्षा अधिक असल्यामुळे सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेच्या सरासरी गुणांमध्ये सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय फरक आढळून येतो. दिव्यांग विद्यार्थ्यांची सरासरी सामान्य विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असल्याने, दिव्यांग विद्यार्थ्यांची सृजनशीलता ही तुलनेने चांगल्या असल्याचे स्पष्ट होते.

उद्दिष्ट क्र. ३ उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

परिकल्पना ३ उच्च प्राथमिक स्तरावरील सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजनामध्ये सार्थक फरक आढळून येत नाही.

| गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t - गुणांक |
|---|---|---|---|---|
| सामान्य विद्यार्थी | ५० | ५९.५६ | ४.४४ | ६.०३ |
| दिव्यांग विद्यार्थी | ५० | ५०.१२ | १०.३७ | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सामान्य विद्यार्थ्यांच्या समायोजनाची सरासरी ५९.५६ असून प्रमाण विचलन ४.४४ आहे, तर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजनाची सरासरी ५०.१२ असून प्रमाण विचलन १०.३७ आहे. प्राप्त t-मूल्य ६.०३ असून ते ०.०५ सार्थकता स्तरावरील सार्थक t-मूल्य १.९८ पेक्षा अधिक आहे. त्यामुळे सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समायोजनाच्या सरासरी गुणांमध्ये सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय फरक आढळून येतो. दिव्यांग विद्यार्थ्यांची समायोजनाची सरासरी सामान्य विद्यार्थ्यांपेक्षा कमी असल्यामुळे, या निष्कर्षावरून सामान्य विद्यार्थ्यांचे समायोजन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक चांगले असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे दोन्ही गटांच्या समायोजनामध्ये सांख्यिकीयदृष्ट्या सार्थक फरक असल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष :

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये केवळ त्यांची बौद्धिक क्षमता महत्त्वाची नसून नियमित अध्ययन सवयी, आत्मविश्वास, भावनिक स्थैर्य, सृजनशीलता, सामाजिक संबंध आणि शालेय वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता यांचाही महत्त्वाचा वाटा असतो. विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी त्यांच्या वैयक्तिक गरजा आणि क्षमतांचा विचार करून त्यांना योग्य शैक्षणिक संधी, आवश्यक सुविधा, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य मिळणे गरजेचे आहे. संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांच्या आधारे असे दिसून येते की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील वैयक्तिक भिन्नता लक्षात घेऊन अध्यापनाच्या पद्धती, अध्ययन साहित्य आणि विविध सृजनशील उपक्रमांमध्ये आवश्यक ते बदल करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना स्वतःचे विचार मांडण्याची, नवीन कल्पना करण्याची आणि विविध प्रकारच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी दिल्यास त्यांच्या सृजनशीलतेला अधिक वाव मिळू शकतो. त्याचप्रमाणे, पालकांनी विद्यार्थ्यांमध्ये नियमित अध्ययनाच्या सवयी लावून त्यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि सृजनशील विचार विकसित होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करावे. शाळेची भूमिकाही या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. सामान्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये परस्पर सहकार्य, समानता आणि स्वीकाराची भावना निर्माण होण्यासाठी शाळांनी विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि सहशालेय उपक्रमांचे आयोजन करावे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना एकमेकांशी संवाद साधण्याची, सहकार्य करण्याची आणि शालेय वातावरणाशी अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेण्याची संधी मिळते. एकंदरीत, दिव्यांग विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी, योग्य मार्गदर्शन, सकारात्मक वातावरण आणि आवश्यक शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या सृजनशीलतेच्या विकासासोबतच शालेय वातावरणाशी समायोजन करण्याची क्षमताही वाढण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमता आणि गरजा लक्षात घेऊन समावेशक, संवेदनशील आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. अशा शिक्षणपद्धतीमुळे सामान्य तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला योग्य दिशा मिळू शकते.

## संदर्भ :


1. भाटिया, एच. आर. (2004). शैक्षणिक मानसशास्त्र. नवी दिल्ली: रजत पब्लिकेशन.
2. Deepthi, D. P., Jeyavel, S., Subhasree, G., & Jojo, C. E. (2022). Proactive coping and social-emotional adjustment among students with and without learning disabilities in Kerala, India. Frontiers in Psychology, 13, 949708. https://doi.org/10.3389/fpsyg.2022.949708
3. घोरमोडे, के. यु., व घोरमोडे, सु. (2008). शैक्षणिक मानसशास्त्र. नागपूर: विद्या प्रकाशन.
4. Government of India. (2016). The Rights of Persons with Disabilities Act, 2016. Ministry of Law and Justice.
5. Gupta, N. (2019). Inclusion: Way forward to redefine classrooms. Journal of Indian Education, 45(2), 49–56.
6. कौल, लोकेश. (1998). शैक्षिक अनुसंधान की कार्य प्रणाली. नवी दिल्ली: विकास पब्लिशिंग हाऊस प्रा. लि.
7. Nazir, S. (2018). Study habits and academic achievement in school children with disabilities. Asian Journal of Advanced Basic Sciences, 6(2), 52–56.
8. National Council of Educational Research and Training. (n.d.). Inclusive and accessible education initiatives. NCERT.
9. Palan, R. (2021). "I seriously wanted to opt for science, but they said no": Visual impairment and higher education in India. Disability & Society, 36(2), 202–225. https://doi.org/10.1080/09687599.2020.1739624
10. Pandey, P. (2017). Assessing self concept and school adjustment level of children with learning disability. International Journal of Indian Psychology, 4(3).
11. Pandey, R. K. (2018). Comparative study of adjustment of visually impaired students. Universal Journal of Educational Research, 6(11), 2562–2571. https://doi.org/10.13189/ujer.2018.061121
12. पाटील, वि. वि. (2015). समावेशक शिक्षण. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
13. Puju, J. A., & Khan, M. A. (2018). Learning style and study habits of visually impaired and orthopedically challenged college-going students. International Journal of Current Science.
14. सावंत, म. ग. (2016). विशेष शिक्षण आणि समावेशक शिक्षण. पुणे: फडके प्रकाशन.

15. Sharma, R. (2016). A study of emotional adjustment of elementary school students with learning disabilities. Journal of Research: The Bede Athenaeum, 7(1), 27–35. https://doi.org/10.5958/0976-1748.2016.00005.9
16. Singh, S. (2013). Impact of the study habit and adjustment on educational achievement of physically handicapped students [Doctoral dissertation, Pandit Ravishanker Shukla University]. INFLIBNET.
17. Singh, V. K., Singh, G., & Jahan, M. (2010). Study habits of visually impaired students in relation to their study related variables. Journal of Indian Education, 36(2), 47–58.
18. Tiwari, S. K. (2025). विशेष आवश्यकता वाले विद्यार्थियों की शिक्षण अधिगम प्रक्रिया एवं समावेशन. Educational Trend, 3(2), 34–39.